15 SEP 2026
तरुण भारत

# विद्यार्थ्यांच्या स्वप्नांसाठी मार्गदर्शन आवश्यक

कोल्हापूर : शैक्षणिक जीवनात विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना सत्यात उतरण्यासाठी शिक्षकांचे मार्गदर्शन महत्वाचे असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे माजी प्र–कुलगुरू तथा डी.वाय. पाटील एज्युकेशन सोसायटीच्या आंतरविद्याशाखीय संशोधन केंद्राचे संचालक प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्यावतीने शिक्षक दिनानिमित्त आयोजीत ऑनलाईन व्याख्यानात ते बोलत होते. त्यांनी 'शिक्षक : विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना पंख देणारा मार्गदर्शक" या विषयावर ऑनलाईन मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी संचालक प्रा. डॉ. प्रतिभा पाटणकर होत्या. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, प्रा.डॉ. ए. एम. गुरव, डॉ. शशिकांत पंचगल्ले, डॉ. प्रल्हाद माने, ॲड. अनिल घाटगे आदी उपस्थित होते. समन्वयक डॉ. कृष्णा पाटील यांनी स्वागत केले. ऑनलाईन एम.बी.ए कोर्स को–ऑर्डीनेटर डॉ. नगीना माळी यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. सहायक प्राध्यापक डॉ.सचिन पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुर्यकांत गायकवाड यांनी आभार मानले.

15 SEP 2026

पुण्यनगरी

# नवीन शिक्षण धोरण विद्यार्थ्यांच्या विकासासाठी उपयुक्त : डॉ. जाधव

**कोल्हापूर :** नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० हे शिक्षण क्षेत्रात परिवर्तन घडवून आणणारे असून, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत उपयुक्त आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या प्र कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या प्रायोजकत्वाखाली कौन्सिल ऑफ एज्युकेशन संचालित देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्सच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या (क्द्अउ) वतीने 'नवीन शिक्षण धोरण २०२० अंतर्गत 'आयकेएस, व्हीईसी, एसईसी, व्हीएसइसी, ओजेटी, फिल्ड प्रोजेक्ट, रिसर्च प्रोजेक्ट व इतर घटकांची प्रभावी अंमलबजावणी' या विषयांवर एकदिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. जाधव प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. अध्यक्षस्थानी कौन्सिल ऑफ एज्युकेशनचे सचिव डॉ. विश्वनाथ मगदूम होते.या कार्यशाळेत डी. आर. माने कॉलेज, कागलचे प्राचार्य डॉ. नंदकुमार कदम, शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विभागाचे प्रमुख डॉ. केदार मारुलकर, आंतरविद्याशाखीय विद्याशाखेचे चेअरमन डॉ. अजय साळी यांनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक प्राचार्या डॉ. वर्षा मैंदर्गी यांनी केले. कार्यशाळेच्या आयोजनासाठी अध्यक्षा रजनीताई मगदूम, उपाध्यक्ष डॉ. प्रसाद मगदूम, सचिव डॉ. विश्वनाथ मगदूम, ॲड. वैभव पेडणेकर, ॲड. अमित बाडकर यांचे मार्गदर्शन लाभले.

1 5 SEP 2026
तरुण भारत



**कोल्हापूर : पारितोषिक वितरण प्रसंगी डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. आलोक जत्राटकर, जयसिंग पाटील, प्राचार्य डॉ. उत्तम पाटील, डॉ. विश्वनाथ मगदूम.**

# 'भाषेवर प्रभुत्व आवश्यक'

त. भा. प्रतिनिधी,

**कोल्हापूर :** चांगला वक्ता होण्यासाठी सर्वस्पर्शीवाचन, समाजाचे सूक्ष्म निरीक्षण, बहुश्रुतता, स्वतंत्र चिकित्सक मांडणी, भाषेवर प्रभुत्व व स्वतःची भाषा शैली आवश्यक आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले.

कौन्सिल ऑफ एज्युकेशनच्या नाइट कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स आयोजित देशभक्त पद्मश्री रत्नाप्पाण्णा कुंभार राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेच्या बक्षिस वितरणप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कौन्सिल ऑफ एज्युकेशनचे सचिव डॉ. विश्वनाथ मगदूम होते. अक्षर दालनचे प्रमुख रवींद्रनाथ जोशी यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन झाले. स्पर्धेमध्ये राज्यातील महाविद्यालयातून ४५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. स्पर्धेचा निकाल : तेजस पाटील (पुणे, प्रथम), अनिकेत वनारे (पुणे, द्वितीय), यश पाटील (मुंबई, तृतीय), वैष्णवी पोतदार (कोल्हापूर, चतुर्थ), संकेत पाटील (कोल्हापूर, पाचवा), भगवंत कोळी (माळवाडी, पुणे, उत्तेजनार्थ) ऋतुजा मुंडे (बोरपाडळे, उत्तेजनार्थ) स्वरूपा राऊत या विद्यार्थिनीला विशेष पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

परीक्षक म्हणून प्रा. डॉ. अनिल गवळी, ज्येष्ठ पत्रकार जयसिंग पाटील, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी काम पाहिले. प्राचार्य प्रा. डॉ. उत्तम पाटील यांनी प्रस्ताविक केले. स्पर्धा प्रमुख प्रा. डॉ. अरुण शिंदे यांनी स्पर्धेचे नियोजन केले.

14 SEP 2026

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या परिसरात विविध रानफुलांच्या बहराला सुरुवात झाली आहे. यंदाही अशी अनेक रानफुले विद्यापीठाच्या परिसरात बहरली आहेत.

# विद्यापीठ परिसरात रानफुलांना बहर

## मखमली ताटवे पाहण्यासाठी निसर्गप्रेमींची गर्दी

**सकाळ वृत्तसेवा**

कंदलगाव, ता. १३ : मॉन्सूनच्या आगमनानंतर शिवाजी विद्यापीठाचा सुमारे दीडशे ते दोनशे एकरांचा विस्तीर्ण परिसर सध्या मनमोहक सौंदर्याने नटला आहे. विद्यापीठाचा बहुतांश गवताळ भाग विविध रंगांच्या चिमुकल्या रानफुलांनी अक्षरशः फुलून गेला आहे.

हिरव्यागार तृणपात्यांवर गुलाबी, पिवळ्या, जांभळ्या आणि पांढऱ्याशुभ्र फुलांचे ताटवे असे काही पसरले आहेत, की जणू निसर्गानेच या भूमीवर मखमली गालिचा अंथरला आहे! वाऱ्याच्या मंद झुळुकीसोबत आनंदात डुलणारी ही रानफुले पाहाणाऱ्यांचे मन क्षणात मोहून टाकत आहेत. निसर्गाच्या या अप्रतिम कलाकृतीमुळे विद्यापीठ परिसर चैतन्यमयी आणि उल्हासित झाला आहे. विद्यापीठाच्या या निसर्गरम्य वातावरणाचा आणि प्रसन्न हवेचा आनंद घेण्यासाठी सकाळी तसेच संध्याकाळी निसर्गप्रेमी, छायाचित्रकार, नागरिक आणि विद्यार्थ्यांची गर्दी होत आहे. लहानांपासून ते ज्येष्ठांपर्यंत प्रत्येकजण या निसर्गसौंदर्यात रमला आहे. सोशल मीडियावर रील्स, शॉर्ट व्हिडिओ आणि फोटोग्राफीसाठी हा परिसर लोकप्रिय केंद्र बनला असून, शहरवासीयांना दैनंदिन धावपळीच्या आयुष्यात शांतता आणि निसर्गाचा संजीवनीसारखा सहवास शोधण्यासाठी हा परिसर पर्वणी ठरत आहे.